क्रमांक : मुदत १०२४/प्र.क्र. २९/नाजकधा-३,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ जानेवारी २००४.

प्रति,

अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
ना.ज.क.धा. नागरी समूह,
बृहन्मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/नागपूर.

उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
ना.ज.क.धा. नागरी समूह,
उल्हासनगर/सांगली/कोल्हापूर/सोलापूर.

17 JAN 2004

विषय :- ना.ज.क.धा. अंतर्गत मंजूर योजनेस मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव पाठविताना घ्यावयाची दक्षता.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपल्या कार्यालयामार्फत नागरी जमिन कमाल धारणा व विनियमन अधिनियम,१९७६ च्या कलम २० व २१ खाली सूट देऊन मंजूर केलेल्या योजनेस मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येतात. यासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, काही योजनाधारक, विकासक योजनेच्या पूर्ण झालेल्या बांधकामाच्या प्रमाणात शासनास हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र हस्तांतरीत न करता मुदतवाढीची मागणी करतात व सक्षम प्राधिका-यांच्या कार्यालयाकडून अशा योजनाधारकांना मुदतवाढ देण्याबाबतची शिफारस करण्यात येते. तसेच काही प्रकरणामध्ये योजनाधारकाने प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे, असे नमूद करुन मुदतवाढीची शिफारस आपल्या कार्यालयामार्फत केली जाते परंतु त्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करुनसुध्दा योजनाधारक शासनास प्रत्यार्पित करावयाचे बांधीव क्षेत्र सदनिकांच्या स्वरुपात शासनास योग्य वेळी प्रत्यर्पित करीत नाहीत. असेही शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

योजना मंजूरीच्या अटीप्रमाणे योजनाधारकाने शासनास ५ टक्के/१० टक्के क्षेत्र प्रत्यार्पित करणे आवश्यकच आहे. त्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करुन मुदतवाढ साध्य करुन घेणे मूळीच अभिप्रेत नाही. ही बाब लक्षात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, ज्या योजनाधारकांनी मुदतवाढ मागितली आहे, त्यांनी योजनेचे जेवढे बांधकाम केले आहे त्याप्रमाणात बांधीव क्षेत्र शासनास प्रत्यार्पित केले नसेल, तर त्यांचेकडून तेवढे बांधीव क्षेत्र सदनिकांच्या स्वरुपात प्रथम घेऊन मगच मुदतवाढीच्या प्रस्तावाची शिफारस करावी. अन्यथा त्यांचे मुदतवाढीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवू नयेत. तेवढे करुन न थांबता जे योजनाधारक सदनिका प्रत्यार्पित करीत नाहीत त्यांच्या योजनेतील सदनिकांची नोंदणी न

लंदर कॉमर्शट.

Smt. Kurvsankar,
Kindly show to all ATP's

Shri. Ahuja/Biwadkar
Pl. note & act accordingly
17/1/04

करण्याबाबत तसेच भोगवटा प्रमाणपत्र न देण्याबाबत संबंधित प्राधिकरणांना लेखी कळविण्यात यावे, व त्या पत्राची प्रत शासनास माहितीसाठी पाठविण्यात यावी. शासनाच्या या निर्देशाच्या अनुषंगाने यापुढे सदनिका प्रत्यार्पित न केलेल्या योजनाधारकांचे मुदतवाढीचे प्रस्ताव शिफारस करुन शासनाकडे पाठविले जाणार नाहीत, याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

आपला विश्वासु,

(आ.ज्ञा.खोत)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) अवर सचिव- (नाजकधा-१ आणि २), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

२) नाजकधा-१,२,३ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) निवडनस्ती (नाजकधा-३) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner